## सल्ला---वेडीला--!!

दिसेल त्यावर प्रेम,
करायचे नसते,
सौंदर्य हकनाक,
उधळायचे   नसते.

बघता कुणी डोळ्यात,
लाजायचे नसते,
हसून उगाउगी,
खळी खुलवायची नसते.

रगेल शीळ येता कानी,
थांबायचे नसते,
सहज म्हणून तरी,
वळून पाहायचे नसते.

जरी अधीर, चंद्र झाला
चांदण्याला बधायचे नसते,
जरी आषाढ करी अंगलट,
पावसात भिजायचे नसते.

मनाच्या सौदागर ची,
वाट पाहायची असते,
म्हणून तर वेडे,
सौंदर्य, जपायचे असते.

**डॉ. विनोद अडबे**